11

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): नवी मुंबई P.S.(ठाणे): पनवेल शहर Year (वर्ष): 2023

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0026 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 13/01/2023 12:53 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): शुक्रवार Date From (दिनांक पासून): 25/11/2022

Time Period (कालावधी): पहर 5 Date To ( दिनांक पर्यंत): 25/11/2022

Time From (वेळेपासून): 12:18 बजे

Time To (वेळेपर्यंत): 13:30 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 13/01/2023 Time (वेळ): 11:30 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद क्र.): 019 Date & Time (दिनांक आणि वेळ): 13/01/2023 12:52 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 1 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): तहसिल कार्यालय पनवेल ,ता पनवेल जि रायगड

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्रीमती विद्युलता शिवाजीचव्हाण

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1983 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.): Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | एसीबी नवी मुंबई,पनवेल शहर ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | एसीबी नवी मुंबई,पनवेल शहर ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9011491914

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. संजय विष्णु पाटील | | | 1. नवरत्न कहौसो रुम नं बी 201,बी 201प्लट नं F-8खांदा कलनी ,सेक्टर 08सुकापुर ,पनवेल शहर ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

दि-13-01-2023

मी विद्युलता शिवाजी चव्हाण, वय. 37 वर्षे, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई 9011491914 समक्ष सरकारतर्फे फिर्याद
लिहून देते की, मी वरीलप्रमाणे असून सप्टेंबर 2021 पासून अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.
तक्रारदार श्री. शाम बाबाराव हंबर्डे वय 40 वर्षे, व्यवसाय मेडिकल दुकान रा. मातोश्री को.ऑप हौ. सोसायटी रूम नं. 05, सुकापुर, तपोवन,
नविन पनवेल, जि. रायगड हे नमुद ठिकाणी कुंटूबियांसह राहतात. तक्रारदार यांचे स्वतःचे आनंद मेडीकल या नावाने सुकापुर पनवेल येथे दुकान
आहे. तक्रारदार हे सन 2011 साली मातोश्री को.ऑप हौ.सोसायटी मध्ये रूम नं.05 विकत घेतली असुन, सदर सोसायटीचे सुमारे 05
वर्षापासुन अध्यक्ष या पदावर काम पाहत आहेत. तक्रारदार यांच्या सोसायटीची जमिन ही बिल्डर श्रीमती. रामकली अग्रवाल यांच्या नावाने
असल्याने सन 2021 मध्ये सदर जमिन सोसायटीच्या नावे करून कन्वेन्सडिड करण्यात आलेले होते. सदर सोसायटीचे कन्वेन्सडिड नुसार
सातबारा उता-यावर सोसायटीच्या नावाची नोंद करून घेण्याकरीता तक्रारदार यांना सोसायटीच्या लेटरहेडवर लेखी अधिकार दिलेले आहेत.
दिनाक 26/08/2022 रोजी तक्रारदार यांनी सोसायटीचे नाव सातबारा उता-यावर नोंद होण्याकरीता आवश्यक कागदपत्र जोडून तलाठी सजा
सुकापुर, मौजे (शिलोत्तर, रायचुर) ता. पनवेल जि. रायगड या कार्यालयात सबमिशन फॉर्म दाखल केला. त्यानंतर तक्रारदार दिनांक
21/11/2022 रोजी तलाठी श्री. संजय पाटील यांना भेटले. त्यांना त्यांच्या मातोश्री सोसयटीचे नाव सातबारा उता-यावर नोंद होण्याकरीत
सबमिषन फॉर्म दाखल केल्याचे सांगुन सदरचे काम कधीपर्यंत पुर्ण होईल याबाबत चौकशी केली असता, त्यांनी तक्रारदार यांनी दाखल केलेले
कागदपत्रे पाहिले व सदरचे काम लवकर होण्याकरीता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे रू. 20,000/- लाचेची मागणी केली. श्री. संजय
पाटील, तलाठी सजा सुकापुर, मौजे (शिलोत्तर, रायचुर) ता. पनवेल जि. रायगड यांना तक्रारदार राहत असलेल्या मातोश्री सोसायटीचे नाव
सातबारा उता-यावर नोंद करण्याकरीता रू. 20,000/- दिले नाहीत तर ते सातबारा उता-यावर नोंद करणार नाही याची तक्रारदार यांना खात्री
झाल्याने श्री. संजय पाटील, तलाठी सजा सुकापुर, मौजे (शिलोत्तर, रायचुर) ता. पनवेल जि. रायगड यांच्या विरूध्द योग्य ती कायदेशीर
कारवाई होण्याकरीता दिनांक 24/11/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई येथे तक्रार दिलेली होती. दिनांक 25/11/2022
रोजी लाचेच्या तक्रारीची पडताळणी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंचासमक्ष तक्रारदार श्री.हंबर्डे यांनी लोकसेवक श्री. संजय पाटील
यांची तलाठी कार्यालय, पनवेल येथे जावुन भेट घेतली. त्यावेळी श्री. संजय पाटील यांना मातोश्री को.ऑ.हौसींग सोसायटीचे नाव सातबारावर
नोंद करण्याकरीता चर्चा करून काम लवकर करण्याबाबत तक्रारदार श्री.हंबर्डे यांनी विनंती केली असता श्री. संजय पाटील हे बर ठिक आहे...
एक काम कर... वीस... एक बिसएक खर्च येईल त्यांची तयारी ठेव... सगळयासणी सांग... मी तुला करून देतो... पण तेरी चुप मेरी चुप... असे

बोलले. त्यावेळी तक्रारदार श्री.हंबर्डे यांनी किती विस हजार ? असे श्री.संजय पाटील यांनी विचारले असता त्यांनी हा असे म्हटले त्यानंतर तक्रारदार श्री.हंबर्डे यांनी सदरची रक्कम जास्त असून सोसायटी मध्ये बारा सभासद असून रक्कम कमी करण्यास विनंती केली असता श्री. संजय पाटील यांनी बरं तुझयाच्यान किती देण होईल. असे तक्रारदार श्री.हंबर्डे यांना विचारले असता तक्रारदार श्री.हंबर्डे यांनी त्यांना दहा एक हजार रूपयांपर्यत कराल का असे विचारले. त्यावेळी श्री. संजय पाटील यांनी कर आज असे बोलून चेक व पैसे समिर कडे देण्याबाबत तक्रारदार श्री.हंबर्डे यांना सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधिल मेमरी कार्डवर ध्वनिमुद्रित करण्यात आलेले असून आहे. सदर बाबत दिनांक 25/11/2022 रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. सदर संभाषणावरून श्री. संजय पाटील हे मातोश्री सोसायटीचे नाव सातबारा उता-यावर नोंद करण्याकरीता रू.20,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. 10,000/- लाचेची रक्कम श्री. समिर यांच्याकडे आणुन देण्याकरीता सांगत असल्याबाबतचे निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार यांना श्री. समिर हे कोण आहेत त्यांना ओळखता का ? याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी श्री. समिर हे श्री. संजय पाटील यांच्याकडे काम करीत असलेले खाजगी इसम असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे लाचेची रक्कम म्हणुन वापरण्याकरीता रू. 10,000/- आता आहेत का असे विचारले असता तक्रारदार यांनी त्यांच्याकडे रू.10,000/- नसल्याबाबत सांगितले. त्यावेळी लगेचच सापळा कारवाई करता येणार नसुन दिनांक 26/11/2022 व दिनांक 27/11/2022 रोजी शनिवार/रविवार श्री.संजय पाटील यांच्या कार्यालयास शासकीय सुट्टी असल्याने समिर व श्री. संजय पाटील यांची भेट होणे शक्य नसल्याने दिनांक 28/11/2022 रोजी सोमवारी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 28/11/2022 रोजी तक्रारदार यांनी फोनकरून त्यांनी त्यांचे स्वतःचे महत्वाचे वैयक्तीक काम असल्याने सापळा कारवाईकरीता हजर राहता येणार नसल्याचे सांगितले त्यावेळी तक्रारदार यांना दिनांक 29/11/2022 रोजी सापळा करावाई करता हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर दिनांक 29/11/2022 रोजी तक्रारदार हे सापळा कारवाई करीता औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, पनवेल येथे हजर झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी श्री. संजय पाटील यांनी मागणी केलेले रू. 10,000/- सापळा कारवाईकरीता सादर केले. त्यांनतर शासकीय वाहनामध्ये सापळापुर्व करावाई पुर्ण करून श्री.संजय पाटील व समिर यांच्याविरूध्द सापळा आजमविणार असल्याचे तक्रारदार श्री.हंबर्डे व पंचाना सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदार श्री.हंबर्डे हे लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व पंचासह श्री. संजय पाटील यांनी सांगितल्यायप्रमाणे श्री. समिर यांना भेटण्याकरीता पनवेल येथील तलाठी कार्यालयात गेले असता समिर व श्री. संजय पाटील हे ऑफिसमध्ये त्यांना दिसले नाही. त्यामुळे समिर व श्री. संजय पाटील यांचेबाबत तक्रारदार यांनी चौकशी केली असता ऑफिसमधील कर्मचारी यांनी श्री. संजय पाटील हे इलेक्शनच्या कामाला आहेत, ग्रामपंचायतीचे फॉर्म भरण्याचे काम चालू असल्याने.ते तीन वाजता येणार आहेत. असे सांगितल्याने तक्रारदार व पंच दोघेही कार्यालयाच्या बाहेर येवुन मोटार सायकल वरून सापळा पथकाच्या ठिकाणी परत आले. सदरचे संभाशण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यावेळी समिर व लोकसेवक हे कामानिमित्त बाहेर असल्याने व ते तीन वाजता त्यांच्या कार्यालयात येणार असल्याने सदर ठिकाणीच थांबण्याचा निर्णय पोनि विद्युलता चव्हाण यांनी घेतला. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री.हंबर्डे हे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व पंचासह मोटार सायकल वरून समिर व श्री. संजय पाटील यांना भेटण्याकरीता तलाठी कार्यालय, पनवेल येथे गेले. त्यावेळी समिर सदर ठिकाणी उपस्थित नसून तलाठी संजय पाटील हे कार्यालयात उपस्थित होते. त्यावेळी दोघेही कार्यालयाचे आत जावून तलाठी श्री. संजय पाटील यांच्या समोरील खुर्च्यावर बसले. त्यावेळी तक्रारदार यांनी श्री. संजय पाटील यांना चेक कोणाच्या नावाने टाकू असे विचारले असता श्री. संजय पाटील यांनी असा चेक आणायचा.. बाकीच ते नंतर कर हा आता फक्त चेकच देऊन जा...नंतर मी सांगतो तुला फोन करून सांगतो...असे श्री.संजय पाटील तक्रारदार यांना बोलले. त्यावेळी तक्रारदार हे फोन करून सांगणार का ? असे श्री.संजय पाटील यांना बोलले. त्यानंतर श्री. संजय पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडून चेक स्वीकारून चेकवर इतर माहिती तक्रारदार यांना विचारून स्वतः भरली. त्यानंतर ओके.. फोन करील तो तुला त्यादिवशी येवून त्याला भेटून जा... असे श्री. संजय पाटील हे तक्रारदार यांना बोलले. त्यावेळी तक्रारदार यांनी लाचेच्या रक्कमेबाबत हे देऊन टाकू असे बोलले असता श्री. संजय पाटील यांनी नोंदणी टाकलेली आहे. नाही काही आता नको नंतर... ज्यावेळी फोन करून सांगेन तुला त्या वेळेला असे सांगितल्याने तक्रारदार व पंच दोघेही कार्यालयाच्या बाहेर येवुन मोटार सायकल वरून सापळा पथकाच्या ठिकाणी परत आले. सदरचे संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. सदर बाबत दिनांक 29/11/2022 रोजी सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. श्री. संजय पाटील हे तक्रारदार यांना फोन करून बोलावणार असल्याने सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात येत असल्याबाबत तक्रारदार श्री.हंबर्डे व पंचाना सांगितले. त्यानंतर श्री. संजय पाटील हे तक्रारदार यांच्याकडे आता काही नको नंतर ज्यावेळी फोन करून सांगेन त्यावेळेला असे सांगितले असल्याने श्री. संजय पाटील हे तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेसबंधी फोन करून बोलावणार असल्याने श्री. संजय पाटील यांचा फोन तक्रारदार यांना आल्यावर पुढील सापळा कारवाई करण्यात येईल त्यावेळी एसीबी, नवी मुंबई, कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना तक्रारदार व पंचाना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर दिनांक 04/01/2023 रोजी तक्रारदर एसीबी नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर झाले व सांगितले की, दिनांक 29/11/2022 रोजी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान श्री. संजय पाटील यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम ते फोन करतील त्या वेळी घेऊन येण्याबाबत सांगितले होते परंतु आजपावेतो तक्रारदार यांना श्री. संजय पाटील यांचा लाचेच्या रक्कमे संदर्भात फोन आलेला नाही तसेच तक्रारदार यांचे सोसायटीचे नाव सात बारा उता-यावर नोंद होण्याचे काम सुध्दा प्रलंबित असल्याने श्री. संजय पाटील यांना फोन करुन ते सांगतील त्यानुसार त्यांना भेटणे योग्य वाटते असे तक्रारदार यांनी सांगितले त्यानुसार श्री. संजय पाटील यांना फोन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर पंचासमक्ष तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईल क्रमांक 9773467156 चा स्पिकर फोन चालू करुन श्री. संजय पाटील यांचे मोबाईल क्रमांक 8108504455 वर 15.36 वाजता फोन केला. सदरवेळी तक्रारदार यांनी श्री. संजय पाटील यांना त्यांच्या पनवेल येथील मातोश्री सोसायटीचे कामासंबंधी फोन केला असल्याचे ओळख श्री. संजय पाटील यांना सांगितली. त्यावेळी श्री. संजय पाटील यांनी तक्रारदार यांना ओळखुन त्यांची सध्या बदली झाली असुन तक्रारदार यांच्या सोसायटीचे कामासंबंधी पनवेल येथील कार्यालयात जाण्याबाबत सांगून लगेचच फोन कट केला. त्यानंतर डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर पुन्हा सुरु करुन तक्रारदार यांनी पुन्हा दोनवेळा श्री. संजय पाटील यांना फोन केला असता दोन्ही वेळा श्री. संजय पाटील यांनी तक्रारादा यांचा फोन कट केला. सदरचे संभाशण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. सदर बाबत दिनांक 04/01/2023 रोजी सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. दिनांक 25/11/2022 रोजी लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळीदरम्यान श्री. संजय पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे मातोश्री सोसायटीचे नाव सातबारा उता-यावर नोंद करण्याकरीता रू.20,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. 10,000/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर दिनांक 29/11/2022 रोजीचे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.संजय पाटील यांनी ते फोन करतील त्यावेळी लाचेची रक्कम घेवून येण्याबाबत तक्रारदार यांना सांगून लाचेची रक्कम स्विकारली नव्हती. दि 04/1/23 रोजी लाचेची रक्कम लोकसेवक यांना देण्याकरीता तक्रारदार श्री हंबर्डे यांनी पंचांसमक्ष संपर्क केला असता त्यांची बदली झाल्याचे सांगुन फोन कट केला आहे यावरुन ते आता तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे संबंधाने संपर्क करतील किंवा त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारतील असे तक्रारदार यांना वाटत नाही असे तक्रारदार श्री हंबर्डे यांनी सांगीतले .

लोकसेवक श्री संजय पाटील यांनी त्यांची बदली झाल्याचे तक्रारदार यांना फोनवनर सांगीतले त्याअनुषंगाने गोपनिय माहीती मिळवीली असता लोकसेवक श्री संजय विष्णु पाटील तलाठी पनवेल यांची पदोन्नती मंडळ अधिकारी पदावर होवुन त्यांची तहसिल कार्यालय अलिबाग येथे बदली झाल्याचे गोपनिय माहीती मिळुन आली आहे.

त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक श्री संजय पाटील यांच्या विरुद्ध पुढील कायदेशीर तक्रार देण्याबाबत विनंती केली असता त्यांनी सांगीतले की लोकसेवक श्री संजय पाटील यांना लाचेच्या रक्कमे संदभात दि 04/1/23रोजी फोन केला असता त्यांनी त्यांची बदली झाल्याचे सांगुन पुढील काम संबंधित तलाठी पनवेल कार्यालय येथुन करुन घेण्याबाबत फोनवर सांगीतले दरम्यानच्या काळात तक्रारदार यांचे मातोश्री सोसायटीचे नाव सातभारा उता-यावर नोंद होवुन काम पुर्ण झाले आहे. त्यामुळे तक्रारदार यांना श्री संजय पाटील यांचेविरुद्ध पुढील कारवाई होणेकरीता तक्रार द्यावयाची नाही. असे तक्रारदार यांनी सांगीतले आहे. त्यानुसार तक्रारदार यांचा दि 10/1/23रोजीचा जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

त्यानंतर श्री संजय विष्णु पाटील तत्कालीन तलाठी सजा सुकापुर ता पनवेल जि रायगड (सध्या मंडळ अधिकारी नेमणुक तहसील कार्यालय अलिबाग ) यांच्या विरुदध सरकार तर्फे फिर्यादी होवुन भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन 1988(संशोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करणेची परवानगी मिळणेकरीता माननीय पोलीस अधिक्षक ए.सी.बी ठाणे कार्यालयास अहवाल सादर करण्यात आलेला होता त्यानुसार मा पोलीस अधिक्षक ए.सी.बी ठाणे कार्यालयाकडील जाक्र .ए.सी.बी /ठाणे /श्री पाटील /तत्कालीन तलाठी / 2023/96 दि 12/1/23 अन्वये श्री संजय विष्णु पाटील तत्कालीन तलाठी सजा सुकापुर ता पनवेल जि रायगड (सध्या मंडळ अधिकारी नेमणुक तहसील कार्यालय अलिबाग ) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश प्राप्त झाला आहे तरी दि 25/11/22रोजीश्री संजय विष्णु पाटील तत्कालीन तलाठी सजा सुकापुर ता पनवेल जि रायगड (सध्या मंडळ अधिकारी नेमणुक तहसील कार्यालय अलिबाग ) यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन श्री हंबर्डे यांचे राहते घराचे मातोश्री को. ऑ.हौ .सो सुकापुर तपोवन नविन पनवेल जि रायगड सोसायटीचे नाव सातबारा उता-या बर नोंद करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रुपये 20,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/-रुपये मागणी केली .श्री संजय विष्णु पाटील तत्कालीन तलाठी सजा सुकापुर ता पनवेल जि रायगड (सध्या मंडळ अधिकारी नेमणुक तहसील कार्यालय अलिबाग ) यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988(संशोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल होणेकरीता सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Dayand Vijay Mahadeshwar
**Rank (पद):** SI (Sub-Inspector)
**No.(क्र.):** DGPDVMM9101 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनवेल शहर पोलीस ठाणे नवी मुंबई

14. **Signature/Thumb impression of the complainant/informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

दयानंद महाडेश्वर
पोलीस उपनिरीक्षक
पनवेल शहर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव)**:** Vijay Trimbak Kadbane
**Rank**(पद)**:** I (Inspector)
**No.**(सं.)**:** DGPVTKM7203

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | [illegible] NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (चा स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तीळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

(जर तक्रारदार/माहिती देणाऱ्याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त याचीत स्तंभांची नोंद केली जाईल.)

6